संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# पोलीस भरतीसाठी समान धोरण हवे

**प्रत्येक** राज्याची कायदा आणि सुव्यवस्था ही स्थानिक पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते.ही कार्यक्षमता टिकवण्याचे किंवा त्याचा दर्जा उच्च ठेवण्याचे काम त्या त्या राज्य सरकारांनाच करावे लागते. देशभर स्थानिक किंवा राज्यांचे पोलीस प्रशासन कसे असावे याबाबत समान नियम जरी असले तरी पोलीस भरती करताना बरीच विविधता आढळून येते. याचा अर्थ कायदा सुव्यवस्थेसारख्या महत्वाच्या गोष्टीबाबतही देशभर समानता नाही. अनेक राज्यांमध्ये थेट पोलीस भरती केली जाते. याची शैक्षणिक पात्रता किंवा निवड करण्याच्या पध्दतीतही फरक आढळून येतो. काश्मिर, हिमाचल, प्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार, पंजाब या राज्यांमधली पोलीस भरती कोणत्याही लेखी परीक्षेशिवाय होते. केवळ शारीरिक क्षमता तपासून आणि किमान दहावी उत्तीर्ण अशी शैक्षणिक पात्रता गृहित धरून पोलिसांची भरती होते. काही राज्यात तर दहावी उत्तीर्ण असलेल्यांना देखील शारीरिक क्षमतेच्या निकषावर पोलीस म्हणून नियुक्त केले जाते. तीच परिस्थिती काही फरकाने ओरिसा, गुजरात, तामिळनाडू ,केरळ या राज्यांमध्ये पाहायला मिळते. महाराष्ट्रात मात्र पोलीस प्रशासनाचा दर्जा अधिक चांगला असावा असा प्रयत्न होताना दिसतो. परंतु शारीरिक क्षमतेसाठी नेमक्या कोणकोणत्या चाचण्या असाव्यात याबाबतही धरसोड वृत्ती पाहायला मिळते. कोणतीही पोलीस भरती असली की उमेदवाराची धावण्याची क्षमता तपासली जाते. त्यालाच सर्वाधिक प्राधान्य दिले जाते. परंतु हे अंतर किती असावे याची मात्र निश्चिती पाहायला मिळत नाही. गेल्या दोन वर्षांपासून धावण्याच्या या अंतरावरून बरीच टीका झाली. अनावश्यकरीत्या तीन तीन किलोमीटर धावण्याची सक्ती केली गेली आणि त्यातून अनेक उमेदवारांना जमिनीवर कोसळावे लागले. अनेकांच्या छातीत दुखण्याचे प्रकार घडण्यापासून ते काहींना हृदयविकाराचे झटके येण्याचाही त्रास झाला. अनेक उमेदवार धावण्याच्या या निकषामध्ये यशस्वी होतात. परंतु त्यांना काही ना काही कारण पुढे करून अपात्र ठरवले जाते. या प्रकाराविषयीसुध्दा उमेदवारांमध्ये संतोष निर्माण झाला होता. हा अन्याय दूर करण्याकरीता यावर्षीपासून शारीरिक क्षमतेपूर्वी लेखी परीक्षा घेण्याचा निर्णय राज्याच्या गृहविभागाने घेतला आहे. जे उमेदवार लेखी परिक्षेत यशस्वी होतील त्यांचीच शारीरिक चाचणी घेतली जाईल. गृहविभागाचा हा निर्णय नक्कीच इच्छुक उमेदवारांवरचा अन्याय दूर करणारा ठरेल.

### पोलीस दलाचे आधुनिकीकरण

कायदा सुव्यवस्थेचे महत्वपूर्ण अंग असलेल्या पोलीस भरतीचे सर्वंकष धोरण अद्यापही आखले गेले नसल्याचा हा ताजा पुरावा म्हणावा लागेल. जर लेखी परिक्षेचा हा निर्णय पंचवीस वर्षापूर्वीच घेतला गेला असता तर कितीतरी तरुण उमेदवारांवरचा अन्याय टळला असता त्यांची निराशा कमी झाली असती. आज बेरोजगारीचे प्रमाण वाढलेले आहे आणि सरकारी नोकरी मिळावी या उद्देशाने अक्षरशः पदवीधर किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम केलेले विद्यार्थीसुध्दा पोलीस भरतीसाठी दाखल होत असतात. गेल्या दहा वर्षातली आकडेवारी पाहिली तर पन्नास टक्के उमेदवार पदवीधर असल्याचेच आढळून येईल. आपल्याकडे असलेली शैक्षणिक पात्रता पोलीस होण्यासाठी का होईना परंतु उपयोगात आली तरी आपल्या शिक्षणाचा उपयोग झाला अशी त्यांची समजूत होती. परंतु शारीरिक क्षमता हाच प्रमुख निकष असल्याने अनेक उमेदवार या पोलीस भरतीसाठी अपात्र ठरत होते. स्वाभाविकपणे त्यांच्यामध्ये प्रचंड नैराश्य निर्माण होत असे. आता निदान लेखी परिक्षेत यशस्वी होणाऱ्यांचीच शारीरिक क्षमता तपासली जाईल आणि या दोन्ही निकषामध्ये पात्र ठरणाऱ्यांना पोलीस दलामध्ये सहभागी होता येईल. या निर्णयामुळे पोलीस दलाचा दर्जा आणि कार्यक्षमता अशा दोन्ही गोष्टी, सुधारू शकतात. आजच्या आधुनिक युगात पोलीस दलाचेही आधुनिकीकरण करायचे असेल तर त्याचा दर्जा आणि कार्यक्षमता या दोन्ही अंगांचा गांभिर्याने विचार झाला पाहिजे. लेखी परीक्षा घेण्याचा हा प्रकार संपूर्ण भारतात पहिलाच असू शकेल महाराष्ट्राने हा पुढाकार घेऊन महत्वाचे पाऊल टाकले आहे असे म्हणता येईल. भविष्यकाळातली कायदा सुव्यवस्थेची बूज राखण्याकरीता अशा सुधारणांची आवश्यकता आहे. किंबहुना महाराष्ट्राने घेतलेल्या निर्णयाचे इतर राज्यांनीही अनुकरण करावे अर्थात आमचा तर असा आग्रह आहे की संपूर्ण देशासाठी पोलीस भरतीकरीता समान नियम आणि निकष असले पाहिजेत.

### तरच गुन्हेगारीला आळा

जगाच्या तुलनेमध्ये भारताची पोलीस व्यवस्था खूपच मागे आहे. एकीकडे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढते आहे. आधुनिकीकरण आणि आर्थिक क्षेत्रातील गैरव्यवहार यामध्येदेखील वाढ झालेली आहे. मोबाईल संगणक किंवा आजच्या डिजिटल युगामध्ये तंत्रज्ञानाचा वापर होत असेल तर या तंत्रज्ञानाशी प्रत्येक पोलीस परिचित असला पाहिजे. कायदा सुव्यवस्था म्हटल्यानंतर केवळ हातामध्ये दंडुका घेऊन फिरणारा पोलिस अशी आता प्रतिमा ठेवता कामा नये. गुन्ह्यांच्या टक्केवारीच्या भाषेत बोलायचे तर साठ टक्के गुन्हे हे तंत्रज्ञानाचा वापर करून शोधून काढता येऊ शकतात. तर आंदोलने निदर्शने या गोष्टींना रोखण्याकरीता संवाद कौशल्याचा वापर करता येऊ शकतो. गुन्ह्यांचे स्वरुप बदलल्याने पोलीस दलाचे स्वरूप बदलणे अपरिहार्य ठरते. आणि मग या पोलीस दलातील सर्वात महत्वाचा असलेला पोलीस शिपाई केवळ शारीरिक क्षमतेच्या निकषावर नियुक्त करून चालणार नाही. त्याची बौध्दिक क्षमताही तितकीच महत्वाची मानावी लागेल. महाराष्ट्राने पोलीस भरतीकरीता लेखी परिक्षेचा निर्णय घेऊन एका अर्थी कायदा सुव्यवस्थेला प्रगत करण्याचा प्रयत्न केला आहे. आमचे तर असे म्हणणे आहे की पुढच्या पंचवीस वर्षामध्ये पदवीधर आणि किमान संगणकाचे ज्ञान असलेल्यांचीच भरती करावी लागेल. तरच गुन्हेगारीला आळा घालता येऊ शकेल.